| MHKO160004072022 | फौजदारी किरकोळ अर्ज क्र.८६/२०२२ मधील नि.क्र. ०४ खालील आदेश |
|---|---|

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज आणि सोबतचे प्रतिज्ञापत्र कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ अन्वये अंतरिम आदेश मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जाची थोडक्यात हकीकत अशी की, अर्जदार आणि वि.प. यांचे लग्न सन १९८२ मध्ये हिंदू धर्मशास्त्र व रितीरिवाजाप्रमाणे करंजोशी येथे झालेला आहे. लग्नानंतर अर्जदार या वि.प. यांच्या घरी नांदण्यासाठी गेल्या. सन १९८९ मध्ये अर्जदार यांना त्या विवाहापासून एक मुलगी झाली. मुलगी झाली म्हणून नाराज होऊन वि.प. यांनी अर्जदार व मुलीची कोणतीही चौकशी केली नाही व मुंबई येथे निघून गेले. त्यांनी अर्जदार यांचे औषध पाणी, कपडेलत्ता व उदरनिर्वाहासाठी कोणतीही सोय करून ठेवलेली नाही. सन २००५ मध्ये अर्जदाराच्या मुलीचे लग्न झालेले आहे. मुंबई येथे गेल्यावर वि.प. यांनी उमा नावाच्या बाईशी अनैतिक संबंध ठेवलेले आहेत, ती वि.प. यांच्या सोबत मुंबई येथे राहू लागली. जमीन विक्रीची रक्कम वि.प. यांनी त्या बाईस नेऊन दिली व अर्जदार हीस दिली नाही. मुंबई येथे नोकरी करून वि.प. यांनी घर खरेदी केलेले आहे. त्या खोलीमध्ये उमा व तिची मुले राहात आहेत. सेवानिवृत्तीनंतर वि.प. हा करंजोशी येथे राहाण्यास आले आहेत, आडगळीच्या खोलीमध्ये त्यांनी अर्जदाराला ठेवले आहे. वि.प. हा कोल्हापुर रत्नागिरी महामार्गालगत राहात असून त्यांनी अमूल पशू खाद्य एजन्सीचा व्यवसाय सुरू केलेला आहे व त्यातून ते चांगला नफा कमावित आहेत. तसेच, वि.प. यांनी बॉक्साईट स्टोरेजसाठी जागा भाड्याने दिलेली आहे व त्यातून त्यांना एक लाख पन्नास हजार रूपये इतके वार्षिक उत्पन्न मिळते. वि.प. यांच्याकडे चार चाकी गाडी आहे, ते चांगल्या पध्दतीने जीवन जगत आहेत. अर्जदार हिला घटस्फोट दे या मागणीवरून वि.प. हे तिचा छळ करीत आहेत.

अर्जदार या वयस्कर असल्यामुळे त्यांना कामधंदा होत नाही. वि.प. यांच्याकडे शेती असून त्यांना त्यातून वार्षिक दोन ते तीन लाख रूपये उत्पन्न मिळते. वि.प. यांची राष्ट्रीय महामार्गात जमीन संपादन होउन त्यांना एक कोटी पंचेच्याळीस लाख रक्कम मिळण्यावर आहे. तसेच मुंबई येथे घराचे दरमहा वीस हजार रूपये इतके घर भाडे त्यांना मिळते. वि.प. यांनी अर्जदाराच्या पोटापाण्याची कोणतीही सोय करून ठेवलेली नाही. म्हणून तिने दरमहा रक्कम रूपये तीस हजार इतकी पोटगी मिळण्याची विनंती केली आहे.

३. वि.प. यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.८ वर दाखल करून लग्न व अपत्याबाबतचा मजकुर मान्य केला आहे व इतर मजकुर नाकारला आहे. त्यांनी कथन केले की, अर्जदार हीचा तिच्या माहेरी ओढा असल्यामुळे ती सासरी चार दिवस व माहेरी एक महिना राहात होती. वि.प. हे कामधंद्यासाठी व मजुरीसाठी मुंबई येथे गेले होते. ते अल्प शिक्षित आहेत, त्यांनी त्यांच्या मुलीचा विवाह योग्य त्या प्रकारे करून दिलेला आहे. अर्जदार हीने सन १९८९ पासून वि.प. यांचेकडे नांदण्यास स्पष्ट नकार दिला, ती तिच्या मुलीकडे शित्तुर येथे राहू लागली. अर्जदार हीने त्यांना सांगितले की मी आता संतती जन्माला घालणार नाही, वंशावळ पुढे झाली पाहीजे म्हणून तिने वि.प. यांना दुसरे लग्न करा असे सांगितले. त्यामुळे वि.प. यांनी उमा हीच्याशी लग्न करून तिला एक मुलगी व एक मुलगा आहे, ती दोन्ही मुले सज्ञान होऊन स्वतंत्र कामधंदा करीत आहेत. अर्जदार ही शेती व रोजगार करून पैसे कमाविते. अर्जदार हीला वि.प.ने सन २०१४ मध्ये शेती विक्रीतून आलेले पाच लाख रूपये व एक लाख दहा हजार रूपये अशी रक्कम पोटगी म्हणुन दिलेली आहे. अर्जदार ही करंजोशी येथे राहाते. वि.प. यांचे मुंबई येथे कोणतेही घर नाही. अर्जदार हीला राहाण्यासाठी सुसज्ज खोली आहे. वि.प. यांनी त्यांचे जागेत जागा मालक म्हणून १/१० हिस्सा व भांडवलदार म्हणून रोहीत दत्तात्रय जांभळे ९/१० हिस्सा स्वरूपात पशू खाद्य आणून विक्री केली जात आहे, त्यामध्ये त्याला नफा मिळत नाही. वि.प. यांच्याकडे कोणतीही चार चाकी गाडी नाही. सदर संपादीत झालेल्या जमीनीचा मोबदला वि.प. यांना मिळणार होता, पण अर्जदार हीने स्पे.दि.मु.नं.२४२/२०२१ हा दाखल केल्यामुळे वि.प. यांना एक पै सुध्दा मिळालेला नाही. वि.प. यांची ग्रा.मि.नं.१७७ वर ची खोली ही दुकान जागेसहची मिळकत वि.प. यांच्या मालकी वहिवाटीची आहे. तसेच, वि.प. यांनी अर्जदार यांचा कोणताही छळ केलेला नाही. रस्ता भरपाईची निम्मी रक्कम अर्जदाराला मिळावी

म्हणून अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल केला आहे. वि.प. यांच्याकडे शेती असून त्यातून त्याला केवळ दोन हजार रूपये उत्पन्न मिळते. तसेच बॉक्साईटच्या स्टोरेजसाठी मिळालेले भाडे त्यांना कंपाउंडमध्ये घातलेले आहे. वि.प. हे अर्जदार यांना स्वतःचे सर्व सुखसोयी देऊन नांदवित आहेत. अर्जदार हीला वि.प. पासून कोणताही धोका नाही. वर नमूद कारणांवरून वि.प. यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यासाठी खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत, मी त्याचा निष्कर्ष कारणांसहित नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार या वि.प. यांनी त्यांचेवर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्राथमिकतः सिध्द करतात काय ? | होकारार्थी. |
| २ | अर्जदार हे वि.प. यांचेकडून अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास किती ? | होय, अंतिम आदेशानुसार. |
| ३ | आदेश ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

### - मुद्दा क्र १ व २ करीता -

५. मी अर्जदार, वि.प. यांचे वादकथन, त्यांनी अर्जासोबत दाखल केलेली कागदपत्रे यांचे अवलोकन केलेले आहे आणि अर्जदार, वि.प. यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकलेला आहे. अर्जदार यांनी नि.क्र.३ वर कागदपत्रे दाखल केली असून वि.प. यांनी नि.१० व नि.१३ वर कागदपत्रे दाखल केली आहेत. अर्जदार हीने तिचे शपथपत्र नि.१४ वर दाखल केले आहे. अर्जदार हीने त्यांचेतर्फे साक्षीदार भरत ज्ञानु मगदुम यांचे शपथपत्र नि.१७ वर तर दशरथ ज्ञानु मगदुम यांचे शपथपत्र नि.१८ वर दाखल केले आहे. वि.प. यांनी त्यांचे शपथपत्र नि.१५ वर दाखल केले आहे.

६. अर्जदार व वि.प. यांचा विवाह सन १९८२ मध्ये झाला व त्या विवाहातुन मुलगी झाल्याचे दोन्ही बांजुना मान्य आहे. तसेच अर्जदार ही आज रोजी सासरी करंजोशी येथे राहत आहे. वि.प. यांनी अर्जदार यांच्या पालनपोषनाची कोणतीही तरतुद केली नसल्याचे दिसते. तसेच वि.प.यांनी अर्जदार हिला शारिरीक व माणसिक त्रास दिल्याचे प्रथमत दिसते. त्यांच्या औषधोपचाराची, कपडयालत्त्याची कोणतीही सोय करुन ठेवली नाही. तसेच त्याने पहीला विवाह अस्तित्वात असताना दुसरा विवाह केला आहे. अर्जदार ही निराश्रीताचे जिवन जगत आहे. त्याने तिला मुंबई येथे नेले नाही. तसेच तिच्या उदरनिर्वाहासाठी कोणतीही तरतुद करुन ठेवली नाही. तो अलिशान जीवन जगत आहे. तसेच त्याचे पशुखादय विक्रीचा व्यावसाय असल्याचे त्याने मान्य केले आहे. तसेच त्याच्याकडे करंजोशी येथे ५७ गुंठे शेती असल्याचे त्याने मान्य केले आहे, त्यातुन वि.प. हा चांगलेच उत्पन्न कमावित असेल. तसेच त्याने मासिक उत्पन्न वीस हजार रुपये असल्याचे कथन केले आहे. वि.प.ची आर्थिक परिस्थीती चांगली असताना व त्याच्याकडे उत्पन्नाचे साधन असताना त्याने अर्जदार हीला उदरनिर्वाहासाठी कोणतीही रक्कम दिली नाही. अर्जदार हिने वि.प.चे शेतीचे व घराचे उतारे दाखल केले आहे. अर्जदार या त्यांचा उदरनिर्वाह व पालनपोषण करण्यास असमर्थ आहेत. वि.प. हे अर्जदार यांची उदरनिर्वाहाची आणि पालनपोषणाची जबाबदारी पार पाडीत नाहीत असे अर्जदार यांनी कथन केले आहे. वि.प. यांची अर्जदार यांचा उदरनिर्वाह, पालनपोषण करण्याची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी आहे आणि वि.प. हे त्या जबाबदारीतून मुक्त होऊ शकत नाहीत. वर नमूद चर्चेमधून वि.प. यांना आर्थिक उत्पन्नाचे चांगले साधन आहे आणि त्यांची अर्जदार यांचा उदरनिर्वाह करण्याची जबाबदारी आहे. वि.प. यांनी अर्जदार यांच्यावर कौटोबिंक हिसांचार केल्याचे प्रथमदर्शनी शाबित होत आहे. सबब, वर नमूद चर्चेमधून वि.प. याचे आर्थिक उत्पपन्नावर ते स्वतः व अर्जदार हे अवलंबून असल्याचे स्पष्ट होत आहे. वि.प. यांचे राहाणीमान, आर्थिक उत्पन्न आणि वर नमूद सर्व घटनांचा विचार होवून अर्जदार यांनादेखिल वि.प. यांच्या दर्जासारखे आयुष्य जगण्याचा अधिकार आहे हे स्पष्ट होत आहे. अर्जदार यांचे पालनपोषण, उदरनिर्वाह या घटनांसाठी वि.प. यांनी कोणतीही तरतूद केलेली नाही ही घटना प्रथमदर्शनी शाबित झालेली आहे. सबब, वर नमूद प्रथमदर्शनी शाबित झालेल्या घटनेस अनुसरून अर्जदार यांना वि.प. यांचेकडून दरमहा पाच हजार इतकी अंतरिम पोटगी देणे योग्य ठरणार आहे.

७. वर नमूद प्रथमदर्शनी शाबित झालेल्या घटनेस अनुसरून मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवित आहे आणि मुद्दा क्र. २ च्या निष्कर्षाकरीता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.४ अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. वि.प. यांना आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अर्जदार यांना दरमहा पाच हजार इतकी अंतरिम पोटगी प्रस्तुतचा अर्ज दाखल तारीख म्हणजे दि. २६/०४/२०२२ पासून मूळ अर्ज (निशानी क्र.१) निकाली होईपर्यंत द्यावी.

Digitally signed by AMOL SHRIRAM SHINDE
Date: 2022.11.10 10:55:28 +0530

दिनांक - ०५/११/२०२२

( अमोल श्रीराम शिंदे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
मलकापूर-शाहुवाडी, जि. कोल्हापुर